# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०९/०९/२०२४ (सोमवार) दुपार

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. बुट्टीबोरी:— अंतर्गत मौजा वाय पॉईन्ट नागपूर वर्धा रोड येथे दिनांक ०८.०९.२०२४ चे ०८.०० वा. दरम्यान बुट्टीबोरी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बुट्टीबोरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन अशोक लेलॅड दोस्त गाडी क्र. एम.एच ४९ ए.टी. ३२०७ क्रमांकाच्या वाहनास थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी क. १) अजिम सलीम अंसारी वय २८ वर्ष रा मोतीबाग अस्लम किराणा स्टोअर्स जवळ बेझनबाग नागपुीर २) जिशान अब्दुल गणी कुरैशी वय ३३ वर्ष रा. मोमीनपुरा अंसार नगर अंसार मस्जीद जफर किराणाजवळ नागपुर ३) कार्तीक पुणाराम नागवंशी वय ६० वर्ष रा. आंबेडकर नगर जि. गोंदिया ह. मु. मोमीनपुरा अंसाद नगर अंसार मस्जीद नागपुर** यांच्या ताब्यातुन दोन मोठया गायी एक काळया रंगाची, दुसरी लाल काळया रंगाची तसेच एक लाल रंगाची लहान गाय व तसेच तीन बछडे तिन्ही लाल रंगाचे तसेच एक गोरा काळा रंगाचा असे ०७ जनावरे किंमती अंदाजे ६०,०००/— रू त्याचे पाय, तोंड व सिगे बांधलेली कोंबुन दिसुन आली तसेच गाडी क्र. एम.एच ४९/ए.टी. —३२०७ अंदाजे किंमती १०,००,०००/—रू असा एकुण १०,६०,०००/—रू. चा अवैद्यरित्या विनापरवाना कोंबुन, निर्दयतेने वागणुक देवून पाण्याची व चाऱ्याची सोय न करता वाहतुक करतांनी मिळून आल्याने आरोपी क्र. १ ते ३ यांचे कडून जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे—रूद्रजी भोजराज पटले वय ३१ वर्ष रा. सातगाव कन्हाळगाव यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम ११(१) (जी), ११(१) (सी), प्रा. छ. प्र. अधि. सह कलम ५, अ, ९ अ, म.प.स.१८४ मोवाका. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण कावळे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोनि प्रतापराव भोसले, पोहवा अरूण कावळे, पोअं अमोल मांढरे यांनी पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर